| वर्ग : १० वा | प्रथम सत्र परीक्षा | S.S.C. |
|---|---|---|
| वेळ : २ तास | विषय : इतिहास व राज्यशास्त्र | एकूण गुण : ४० |
| S.No. | History - Political Science | माध्यम : मराठी (MH) |

सूचना : १) सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.
३) प्रश्न क्र. १ ते ५ प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्र. ६ ते ९ प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.
४) प्रश्न क्रमांक १ (अ) व प्रश्न क्रमांक ६ मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.
५) प्रश्न क्र. २ (अ) मधील आणि प्रश्न क्र. ८(ब) मधील दिलेली माहिती संकल्पनाचित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहेत.

प्रश्न १. अ) खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. (०३)

१) आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज हा ग्रंथ ............ याने लिहिला.

अ) कार्ल मार्क्स ब) मायकेल फुको

क) लुसिआँ फेबर ड) व्हॉल्टेअर

२) मथुरा शिल्पशैली ............ काळात उदयाला आली.

अ) कुशाण ब) गुप्त क) राष्ट्रकूट ड) मौर्य

३) भारतातील 'बेंगॉल गॅझेट' हे पहिले इंग्रजी वर्तमानपत्र ............ यांनी सुरु केले.

अ) जेम्स ऑगस्टस हिकी ब) सर जॉन मार्शल

क) ॲलन ह्यूम ड) माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन

ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा व लिहा. (०३)

१) विचारवंताचे नाव — ग्रंथाचे नाव

i) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल - रिझन इन हिस्टरी

ii) लिओपॉल्ड व्हॉन रांके - द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी

iii) हिरोडोटस - द हिस्टरीज

iv) कार्ल मार्क्स - डिसकोर्स ऑन द मेथड

https://www.maharashtrastudy.com

२) वृत्तपत्र — संपादक

i) प्रभाकर - आचार्य प्र. के. अत्रे

ii) दर्पण - बाळशास्त्री जांभेकर

iii) दीनबंधू - कृष्णराव भालेकर

iv) केसरी - बाळ गंगाधर टिळक

३) नाटकाचे नाव — नाटककाराचे नाव

i) रायगडला जेव्हा जाग येते - वसंत कानेटकर


ii) टिळक आणि आगरकर - विश्राम बेडेकर

iii) साष्टांग नमस्कार - आचार्य अत्रे


iv) एकच प्याला - अण्णासाहेब किर्लोस्कर

प्रश्न २. अ) पुढे दिलेल्या सूचनेप्रमाणे संकल्पना चित्र पूर्ण करा. (कोणतेही दोन) (०४)


१)




२)




३)






https://www.maharashtrastudy.com

ब) टिपा लिहा. (कोणतेही दोन) (०४)

१) अठराव्या शतकात इतिहास लेखनात झालेले बदल २) शिल्पकला

३) वर्तमानपत्रांचे स्वातंत्र संग्रामातील कार्य

४) रंगभूमी व चित्रपट क्षेत्रांशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

प्रश्न ३. खालील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन) (०४)

१) मायकेल फुको यांच्या लेखन पद्धतीला ज्ञानाचे पुरातत्त्व म्हटले आहे.

२) जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.

३) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

४) कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

प्रश्न ४. खालील दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (०४)

वैज्ञानिक ज्ञानशाखांमध्ये उपलब्ध ज्ञानाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी प्रायोगिक पद्धती आणि प्रत्यक्ष निरीक्षण यांचा अवलंब केला जातो. या पद्धतीच्या आधारे विविध घटनांच्या संदर्भातील सार्वकालिक आणि सार्वत्रिक नियम मांडणे आणि ते नियम पुन्हा पुन्हा सिद्ध करता येणे शक्य असते. इतिहास संशोधनामध्ये प्रायोगिक पद्धती, प्रत्यक्ष निरीक्षण यांचा अवलंब करणे शक्य नसते कारण इतिहासातील घटना घडून गेलेल्या असतात, तेव्हा त्यांच्या निरीक्षणासाठी आपण तेथे नसतो व त्या घटनांची पुनरावृत्ती करता येत नाही. तसेच सार्वकालिक आणि सार्वत्रिक नियम मांडणे आणि ते नियम सिद्ध करता येणे शक्य नसते. https://www.maharashtrastudy.com

सर्वप्रथम ऐतिहासिक दस्तऐवज लिहिण्यासाठी ज्या भाषेचा आणि लिपीचा वापर केला गेला असेल, त्याचे वाचन करण्यासाठी आणि त्याचा अर्थ समजण्यासाठी ती भाषा आणि लिपी जाणणाऱ्या तज्ज्ञाची आवश्यकता असते. त्यानंतर अक्षरवटिका म्हणजे अक्षराचे वळण, लेखकाची भाषाशैली, वापरलेल्या कागदाच्या निर्मितीचा काळ आणि कागदाचा प्रकार, अधिकारदर्शक मुद्रा यांसारख्या विविध गोष्टींचे जाणकार संबंधित दस्तऐवज अस्सल आहे की नाही, हे ठरवण्यास मदत करूशकतात. त्यानंतर इतिहासतज्ज्ञ ऐतिहासिक संदर्भाच्या तौलनिक विश्लेषणाच्या आधारे दस्तऐवजातील माहितीच्या विश्वासार्हतेची पडताळणी करू शकतात.

प्रश्न : १) कोणत्या पद्धतींच्या आधारे विज्ञानाचे नियम वारंवार सिद्ध करता येतात ? (०१)

२) इतिहासलेखनासाठी कोणाकोणाचे साहाय्य आवश्यक असते ? (०१)

३) इतिहासलेखनाच्या मर्यादा स्पष्ट करा. (०२)

प्रश्न ५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (०६)

१) कार्ल मार्क्स यांचा वर्ग सिद्धांत स्पष्ट करा.

२) कलाक्षेत्रात व्यवसायाच्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.

३) पुढील विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती कशी उपयुक्त ठरेल ते स्पष्ट करा. अ) विज्ञान ब) कला क) व्यवस्थापन शास्त्र



https://www.maharashtrastudy.com

प्रश्न ६. खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. (०२)

१) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थामध्ये महिलांसाठी ............ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. अ) २५% ब) ३०% क) ४०% ड) ५०%

२) मतदार संघ निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाची ............ समिती करते.
अ) निवड ब) परिसीमन क) मतदान ड) वेळापत्रक

प्रश्न ७. खालील दिलेले विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)

१) संविधानाचे स्वरुप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते. (०४)

२) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते.


३) राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

प्रश्न ८. अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही एक) (०२)


१) संविधानाची मूलभूत चौकट २) निवडणूक आयोग

ब) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा. (कोणतेही एक) (०२)

१)




२)




प्रश्न ९. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही एक) (०२)

१) मतदाराचे वय २१ वर्षावरुन १८ वर्ष केल्यामुळे कोणते परिणाम झाले.

२) निवडणूक आयोगाची कार्य स्पष्ट करा.

३) राजकिय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

* * * * * *



https://www.maharashtrastudy.com